# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:28.06.2025** **वार:शनिवार**

1. जैन धर्मातील आध्यात्मिक गुरु आचार्य विद्यानंदजी महाराज यांच्या जन्म शताब्दी महोत्सवाचा आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत प्रारंभ.
2. ऑपरेशन सिंधु अंतर्गत आतापर्यंत एकंदर 4415 भारतीयांना मायदेशी परत आणल
3. बिहारमध्ये आज स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रथमच मोबाइल ॲप च्या माध्यमातून नागरिक ई मतदान करणार, अशी सुविधा देणार बिहार हे देशातल पहिल राज्य आणि
4. आशियाई स्नूकर अजिंक्यपद स्पर्धेत कतारचा पराभव करत भारतीय संघाचा उपांत्य फेरीत प्रवेश

**पंतप्रधान**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीत जैन धर्मातील आध्यात्मिक गुरु आचार्य विद्यानंद जी महाराज यांच्या जन्मशताब्दी महोत्सवाचा प्रारंभ करणार आहेत. यावेळी ते उपस्थितांना संबोधित करणार आहेत. भगवान महावीर अहिंसा भारती ट्रस्ट यांनी या कार्यक्रमांच आयोजन केल असून, या मार्फत वर्षभर विविध आध्यात्मिक सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रम राबवण्यात येणार आहेत. आचार्य विद्यानंद जी महाराज हे जैन समाजातील आध्यात्मिक गुरु आणि समाज सुधारक होते. त्यांनी जैन दर्शन आणि नैतिकता या विषयावर 50 रचना केल्या असून प्राकृत, जैन दर्शन आणि शास्त्रीय भाषांच्या विकासासाठी त्यांनी कार्य केल. तसच देशातील अनेक जैन मंदिरांचा जीर्णोद्धार ही केला.

**राष्ट्रपती**

देशाच्या शाश्वत आर्थिक विकासासाठी मजबूत MSME अर्थात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग परिसंस्था आवश्यक असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्ली इथं आंतरराष्ट्रीय MSME दिनाच्या निमितान आयोजित कार्यक्रमात काल त्या बोलत होत्या. MSME क्षेत्र देशाच्या प्रगतीत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचं त्या म्हणाल्या. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे भारतीय आणि जागतिक अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. जगभरात MSME क्षेत्राची महत्त्वाची भूमिका ओळखून संयुक्त राष्ट्रांनी 2017 मध्ये 27 जून हा दिवस आंतरराष्ट्रीय MSME दिन म्हणून घोषित केला आहे.

**ऑपरेशन सिंधु**

इस्त्राइल आणि इराण युद्धाच्या पार्श्वभूमीवर राबवण्यात आलेल्या ऑपरेशन सिंधु अंतर्गत आतापर्यंत एकंदर 4 हजार 415 भारतीयांना पुनः मायदेशी परत आणण्यात आल आहे. यामध्ये इराण मधून 3 हजार 597 तर इस्तराईल मधून 818 भारतीयांना विशेष विमानाने भारतात परत आणण्यात आले आहे. यामध्ये दीड हजारा पेक्षा जास्त महिला आणि 5 शे लहान मुलांचा समावेश आहे. या बरोबच 14 ओ सी आय कार्ड धारक, 9 नेपाळी नागरिक, 4 श्रीलंकेचे नागरिक आणि 1 इराणी यांचा ही या मध्ये समावेश आहे. दरम्यान, परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी काल इराणचे परराष्ट्र मंत्री सय्यद अब्बास अरघची यांच्याशी इराणमधल्या परस्थितीबाबत चर्चा केली. इराणच्या परराष्ट्र मंत्र्याशी झालेली चर्चा फलदायी ठरल्याचं एस

जयशंकर यांनी समाजमाध्यमावर प्रसिद्ध केलेल्या संदेशात म्हटलं आहे. भारतीय नागरिकांना मायदेशी सुरक्षित परत आणण्यासाठी सहकार्य केल्याबद्दल जयशंकर यांनी सय्यद अरघची यांचे आभार मानले आहेत.

**करार**

जम्मू काश्मीर मधील किशनगंगा आणि रातले जलविद्युत प्रकल्पाबाबत मध्यस्थ न्यायालयाने दिलेला निर्णय मान्य करायला भारताने नकार दिला आहे. पहलगाम अतिरेकी हल्ल्यानंतर भारताने सिंधु नदी पाणीवाटपा बाबतचा पाकिस्तानबरोबरचा करार स्थगित केला असून, हा निर्णय या कराराचा भंग करणारा तसच पाकिस्तान धार्जिणा आहे. भारताने या मध्यस्थ न्यायालयाच्या स्थापनेला कधीही कायदेशीर मान्यता दिलेली नाही त्यामुळे हा निर्णय भारताला मान्य नाही अस परराष्ट्र मंत्रालयाने म्हंटल आहे.

**अमित शहा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल गुजरात मधल्या गांधीनगर इथ माहिती आणि ग्रंथालय संपर्क केंद्राला भेट देऊन पाहणी केली. यासंदर्भात समाजमाध्यमावरील आपल्या संदेशात अमित शहा यांनी म्हंटल आहे की या केंद्राच्या माध्यमातून सर्व ग्रंथालये अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने जोडण्याच महत्वपूर्ण कार्य केल जात आहे. यावेळी अमित शहा यांनी सस्तू साहित्य वर्धक कार्यालय मोबईल ॲपच देखील उद्घाटन केल. या मोबईल ॲपद्वारे नागरिक आपल्या आवडीची पुस्तके घरी मागवु शकतील.

**मतदान**

बिहार मध्ये आज होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये प्रथमच मोबाइल ॲप च्या माध्यमतून नागरिक ई मतदान करणार असून, अशा प्रकारे निवडणुकीत मतदानासाठी मोबाइल ॲपचा वापर करणारे बिहार हे देशातले पहिलेच राज्य ठरले आहे. आज बिहार मधील 6 नगर पंचायत आणि 36 नगर पालिकांमध्ये निवडणुका होत असून सकाळी 7 ते संध्याकाळी 5 दरम्यान मतदान होत आहे. यामध्ये प्रथमच मोबाइल द्वारे ई मतदान करण्यासाठी 40 हजार नागरिकांनी अर्जाद्वारे नाव नोंदणी निवडणूक आयोगाकडे केली आहे. सकाळी 7 ते 1 दरम्यान हे मतदार मोबाइल ॲप द्वारे मतदान करणार आहेत. बिहारसाठी आजचा दिवस ऐतिहासिक असल्याच राज्य निवडणूक आयुक्त दीपक प्रसाद यांनी म्हंटल आहे. या मोबाइल ॲप द्वारे मतदानाचा हक्क बजा वण्याचा फायदा नोकरदार, ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला, गंभीर आजाराने त्रस्त नागरिक आणि दिव्यांग नागरिकांना होईल अस प्रसाद यांनी सांगितल. ई मतदानासाठी पुण्यातील सीडॅक संस्थेने सर्व सुरक्षा व्यवस्था असलेल्या आणि व्ही व्ही पॅट ची सुविधा असलेल्या दोन मोबाइल ॲपच्या यंत्रणा विकसित केल्याचही दीपक प्रसाद यांनी सांगितल.

**मुख्यमंत्री**

महाराष्ट्रात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मोठ्या गणेश मूर्तींच्या विसर्जनासंदर्भात प्रथा, परंपरांचा मान राखत पर्यावरणाच्या दीर्घकालीन उपाययोजनांचा समावेश असलेलं धोरण तयार करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत. पर्यावरणपूरक सण साजरे करण्यासंदर्भात मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली काल मुंबईत बैठक झाली, त्यावेळी ते बोलत होते. सार्वजनिक गणेश विसर्जनानंतर समुद्रकिनारे स्वच्छ करण्याची काळजी घेण्यासाठी ठोस उपाय करावेत तसंच गणेशमूर्ती तयार करताना पर्यावरणस्नेही सामुग्रीचा आणि नैसर्गिक रंगाचा वापर करावा असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं. या बैठकीला सांस्कृतिक कार्यमंत्री आशीष शेलार यांच्यासह वरीष्ठ सरकारी अधिकारी उपस्थित होते.

**साखर उत्पादन**

सन 2026 च्या साखर हंगामात भारतातलं साखर उत्पादन 15 टक्क्यानं वाढून साडेतीन कोटी टनांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडल्यामुळे ही वाढ होण्याची शक्यता एका पतमानांकन संस्थेच्या अहवालात वर्तवली आहे. जास्त पाऊस पडल्यामुळे ऊस उत्पादक राज्यांमध्ये, विशेषतः महाराष्ट्र आणि कर्नाटकात, उसाचं उत्पादन आणि लागवडीखालचं क्षेत्र वाढणार आहे. पुरवठा वाढल्यामुळे देशांतर्गत पुरवठ्याची चिंता कमी होईल. धोरणात्मक परिस्थिती अनुकूल राहिली तर इथेनॉल उत्पादनही मोठ्या प्रमाणात होईल, असं या अहवालात म्हटलं आहे.

**महिला क्रिकेट**

इंग्लंड आणि भारतीय महिला संघादरम्यान खेळल्या जाणाऱ्या पाच सामन्यांच्या टी -20 आंतरराष्ट्रीय क्रिकेट मालिकेला आजपासून इंग्लंड मधील टेंट ब्रिज नॉटिंगहॅम इथं सुरुवात होत आहे. भारतीय प्रमाणवेळेनुसार संध्याकाळी सात वाजता सामन्याला सुरुवात होईल. भारतीय संघानं नुकत्याच श्रीलंके विरुद्ध झालेल्या एकदिवसीय-तीन सामन्यांच्या मालिकेत उत्तम कामगिरी बजावली आहे. दोन्ही संघांमध्ये डिसेंबर 2023 नंतर प्रथमच 20 षटकांचा सामना खेळला जाणार आहे. पुढच्या वर्षी जून महिन्यात लंडन इथं महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धा होणार आहेत.

**स्नूकर स्पर्धा**

कोलंबो इथ सुरू असलेल्या आशियाई स्नूकर अजिंक्यपद स्पर्धेत भारतीय संघाने काल कतार चं 3-0 असा पराभव करत उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. भारताचा विश्वविजेता खेळाडू पंकज अडवाणी याने काल एकेरी सामन्यात अली अल ओबैदली ला 62-24 असे गुण मिळवत हरवल. दुसऱ्या एकल सामन्यात भारताचा सुवर्णपदक विजेता खेळाडू आदित्य मेहता याने बशर अब्दुल मजीद याचा 115-5 गुणांनी पराभव केला. दुहेरी सामन्यात पंकज अडवाणी आणि ब्रिजेश दमानी यांनी विजय नोंदवला.

**हवामान**

पुढील 2 ते 3 दिवसांत नैऋत्य मान्सून देशभरात पुढे सरकण्यासाठी अनुकूल परिस्थिती असल्याच भारतीय हवामान विभागाने म्हंटल आहे. या अंदाजानुसार, पुढील 7 दिवसांत वायव्य, मध्य, पूर्व आणि ईशान्य भारतात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. गुजरात, केरळ, मध्य महाराष्ट्र आणि उत्तराखंडमध्ये आज ही जोरदार पाऊस कायम राहील. पुढील 2 ते 3 दिवसांत पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, पूर्व राजस्थान, पश्चिम राजस्थान आणि जम्मू आणि काश्मीरच्या काही भागात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

# या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार